# संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ
## (नॅकद्वारा 'अ' मानांकन प्राप्त)

**जनसंपर्क विभाग**

---

## गुणवत्ता व दर्जा उंचावण्यासाठी रुसा महत्वाचे पाऊल
## भविष्यकालीन वेध घेवून उच्चशिक्षणात बदलाची गरज - डॉ. जोशी
## विद्यापीठात प्राचार्यांची सभा संपन्न

अमरावती.

महाराष्ट्र राज्यासमोर उच्चशिक्षणाची गुणवत्ता व दर्जा वाढविण्यासारखे अनेक प्रश्न आहेत. सार्वत्रिक शैक्षणिक विकास करण्यासाठी राज्यात सातत्यपूर्ण प्रयत्न सुरु आहेत. उच्चशिक्षणातील गुणवत्ता व दर्जा उंचावण्यासाठी रुसा २.० महत्वाचे पाऊल आहे. त्या मार्गदर्शन तत्वानुसार विद्यापीठ आणि महाविद्यालयांनी कार्य करावे, असे आवाहन रुसाचे राज्य प्रकल्प संचालक डॉ. विजय जोशी यांनी केले. विद्यापीठाच्या दृकश्राव्य सभागृहात शासकीय व शासन अनुदान प्राप्त महाविद्यालयांचे प्राचार्य व आय.क्यु.ए.सी. समन्वयक यांची संपन्न झाली, त्याप्रसंगी रुसा २.० संदर्भात माहिती देतांना ते बोलत होते. व्यासपीठावर अध्यक्षस्थानी प्र-कुलगुरु डॉ. राजेश जयपूरकर, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ.जे.डी. वडते, आय.क्यु.ए.सी. प्रभारी डॉ.सौ. मनिषा काळे, रुसा सल्लागार डॉ. अक्षय कदम उपस्थित होते.

डॉ. जोशी पुढे म्हणाले, रुसा अंतर्गत महाराष्ट्राला ३४० कोटी रुपये प्राप्त झाले आहेत. त्यामध्ये संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाला २० कोटी रुपयाचे अनुदान मंजूर झाले आहे. रुसा २.० बाबतची माहिती देतांना ते म्हणाले, पाचशे शासकीय व शासन अनुदानीत महाविद्यालयांनी रुसा २.० अंतर्गत अर्ज करायचे आहे. महाराष्ट्रातील दोनशे पात्र महाविद्यालयांना स्वायत्तता देण्याचे उद्दिष्ट आहे. याशिवाय अभ्यासक्रमामध्ये अमूलाग्र बदल, राज्यातील विद्यापीठे व महाविद्यालयांच्या नॅकच्या दर्जात सुधारणा, संशोधन आणि अन्वेषण, महाराष्ट्रात नॅक साहाय्यता सेल, रोजगार वाढविण्यासाठी प्रशिक्षक मनुष्यबळासह प्लेसमेन्ट सेल, डाटा कलेक्शन, क्लस्टर विद्यापीठाचा दर्जा महाविद्यालयांना देणे आदींबाबत त्यांनी माहिती दिली.

शासकीय व शासन अनुदान प्राप्त महाविद्यालयांना रुसाचे अनुदान मिळणार असून त्याकरीता महाविद्यालयांनी नॅकचे मूल्यांकन वाढविण्यावर भर देण्याचे गरज आहे. याशिवाय एन.आय.आर.एफ. आणि आंतरराष्ट्रीय रँकिंगमध्ये अव्वल येण्याचा प्रयत्न करायचा आहे. रुसा सल्लागार डॉ. अक्षय कदम यांनी जीओ टॅगिंग ॲपच्या संदर्भात सविस्तर माहिती दिली. प्र-कुलगुरु डॉ. राजेश जयपूरकर यांनी राष्ट्रीय उच्चतर शिक्षण अभियानांतर्गत उच्चशिक्षणाचा सर्वांगिण विकास करण्यासाठी शासनस्तरावर होत असलेल्या प्रयत्नांमध्ये महाविद्यालयांनी सहभागी होवून विकास करण्याची गरज आहे. रुसा २.० बाबतची माहिती सर्वांना मिळावी, यासाठी प्राचार्य आणि आय.क्यु.ए.सी. समन्वयक यांना आमंत्रित करुन मार्गदर्शन मिळावे, यासाठी आयोजित सभा फलदायी ठरेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

विद्यापीठ गीताने सुरु झालेल्या सभेत पाहुण्यांचे पुस्तक देवून स्वागत परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ.जे.डी. वडते व उपकुलसचिव श्री मंगेश वरखेडे यांनी केले. संचालन डॉ. अनिता पाटील यांनी, तर आभार डॉ. मनिषा काळे यांनी मानले. याप्रसंगी प्राचार्य डॉ.व्ही.जी. ठाकरे, डॉ. चांडक, प्राचार्य डॉ. राजीव सदन, डॉ.आर.एम. पाटील, डॉ. अविनाश जुमळे, डॉ. गावंडे, श्री मंगेश वरखेडे यांनी रुसा २.० संदर्भात विचारलेल्या प्रश्नांना डॉ. विजय जोशी यांनी समर्पक उत्तरे दिलीत. सभेला व्य.प. सदस्य डॉ.एफ.सी. रघुवंशी, अधिष्ठाता डॉ. स्मिता देशमुख, प्राचार्य, आय.क्यु.ए.सी.चे समन्वयक आणि प्राधिकारिणींचे सदस्य उपस्थित होते.

---

प्रति,

**जनसंपर्क विभाग**

मा. संपादक/जिल्हा प्रतिनिधी

दि. ३१/०५/२०१८.

दै............................... अमरावती.

मा. महोदय,

आपणांस विनंती करण्यात येते की, सोबतच्या वृत्तास आपल्या लोकप्रिय वृत्तपत्रातून कृपया प्रसिद्धी द्यावी, ही विनंती.

आपला,

**(डॉ. विलास नांदुरकर)**

जनसंपर्क अधिकारी